समुद्री सीगल

अल्बर्ट

मराठी : अश्विनी बर्वे



समुद्री सीगल

अल्बर्ट

अल्बर्ट, एक मोठा समुद्री सीगल आहे. त्याचे रोमांचक कारनामे वाचून मुलांना खूप मजा येईल. सगळ्यांना माहीत आहे समुद्री सीगलचे दिसणे शुभ मानले जाते. अल्बर्टला भेटल्यावर तुम्हांला सुद्धा असेच्च वाटेल....





अल्बर्ट एक सीगल पक्षी होता.

तो एक विशाल समुद्री पक्षी होता.

इंग्रजीत त्याला   अल्बाट्रोस, म्हणतात.



कारण समुद्री पक्ष्याला शुभ मानलं जातं. म्हणून जहाजावरच्या नाविकांना अल्बर्टला पाहयला आवडत असे.



जेव्हा अल्बर्ट जहाजाचा पाठलाग करत तेव्हा नाविक खूप खुश होत.



एक दिवस समुद्रात भयंकर वादळ आले.
हवा जोरात वेगानं सू-सू करत वाहू लागली.



त्यानंतर नाविकांना अल्बर्ट दिसला नाही.



अल्बर्टलाही नाविक दिसले नाही.



अल्बर्टला आपल्या समोर फक्त जमीन दिसत होती.



“तू समुद्र पाहिला आहे का?”
अल्बर्ट ने पिंजऱ्यात बंद असणाऱ्या पक्ष्याला विचारले.



तो पक्षी म्हणजे एक पोपट होता.
“मला एक बिस्कीट पाहिजे,” पोपट म्हणाला.



“तू समुद्र पाहिला आहेस का?”
अल्बर्टने घडाळ्यातल्या पक्ष्याला विचारलं.



तो पक्षी म्हणजे कोकीळ होता.
“कुहू-कुहू-कुहू,“ कोकीळ म्हणाला.




“तू समुद्र पाहिला आहेस का?”
अल्बर्टने झाडावरच्या पक्ष्याला विचारलं.



तो सुतार पक्षी होता.
“ठक–ठक-ठक,” सुतार पक्षी म्हणाला.



“तू समुद्र पाहिला आहेस का?”
अल्बर्ट ने चर्च वर बसलेल्या चिमणीला विचारलं.



ती चिमणी टीनची बनवलेली होती.
म्हणून तिनं काहीच उत्तर दिलं नाही..



मग अल्बर्ट उड़त एका टोप्यांच्या दुकानात गेला.



“मला समुद्री यात्रेसाठी एक पक्षी असणारी
टोपी हवी आहे,” एक श्रीमंत स्त्री म्हणाली.



“किती सुंदर टोपी आहे,” महिलेचा मित्र म्हणाला.
”हा पक्षी तर बिलकुल खरी वाटत आहे.”

"धन्यवाद," महिला खुश होत म्हणाली.
“मी ही टोपी समुद्रात जहाजावर घालेन.”





त्यानंतर प्रवासी जहाजावर चढले.
लोकांनी प्रवाशांनी अच्छा केला.

“अच्छा-बाय”.



मग दुपारीजेवणाची वेळ झाली. “मी आपल्याला ओळखतो.” कप्तान त्या महिलेला म्हणाला.
“नाही, आपण मला ओळखत नाही,” महिला म्हणाली.



कप्तानने महिलेला म्हटलं.
“मी तुम्हांला नाही, तर आपल्या टोपीवर बसलेल्या पक्ष्याला जरूर ओळखतो.”



"अरे बाप रे!" महिला ओरडत म्हणाली.
“मला माझ्या टोपीवर खरा पक्षी नकोय.”




“पण आम्हांला खरा पक्षी खूप आवडतो,” जहाजावरचा नाविक म्हणाला. “आम्हांला तो समुद्री सीगल हवा आहे. तो म्हणजे चांगल्या नशिबाची खुण आहे.”





“हे माझं चांगलं भाग्यच आहे की, मी परत आपल्याला भेटू शकलो,” अल्बर्ट नाविकांना म्हणाला.

"जहाजावर तुझं स्वागत आहे,” सगळ्या नाविकांनी म्हटलं.



समाप्त